**ग्रामीण कृषी मौसम सेवा**

भारत मौसम विभाग

प्रायोगिक ब्लॉक लेव्हल ॲग्रोमेट ॲडव्हायझरी बुलेटिन

(आयएमडी आणि आयसीएआर चा संयुक्त उपक्रम)

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला

**दिनांक : 20-12-2024**

**नागपूर(महाराष्ट्र) मध्ये सावनेर ब्लॉक करा साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2024-12-20 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)**

| हवामान घटक | 2024-12-21 | 2024-12-22 | 2024-12-23 | 2024-12-24 | 2024-12-25 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 |
| कमाल तापमान (अं.से) | 29.4 | 29.7 | 28.8 | 28.9 | 29.6 |
| किमान तापमान (अं.से) | 18.0 | 16.9 | 17.1 | 15.7 | 15.8 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 74 | 75 | 76 | 80 | 83 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 43 | 46 | 47 | 51 | 53 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 10 | 11 | 11 | 12 | 10 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 175 | 181 | 107 | 103 | 102 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 1 | 1 | 2 | 5 | 4 |

## हवामान सारांश / चेतावणी:

• भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर च्या मूल्यवर्धित अंदाजानुसार, तालुक्यात, पुढील पाच दिवस दिनांक २१ ते २५ डिसेंबर २०२४ दरम्यान आकाश आंशिक ते अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता, • दिनांक २१, २२, २३, २४ व २५ डिसेंबर २०२४ रोजी हवामान कोरडे राहण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. • विदर्भामध्ये पुढील ५ दिवसा दरम्यान किमान तापमानात २ ते ३ अंश सेल्सिअस ने वाढ होईल.

## कृषि सल्ला:

• कोरड्या हवामानाचा अंदाज लक्षात घेता कापूस पिक पिकाची बोंडे फुटून कापूस बाहेर पडण्याच्या अवस्थेत आहे तेथे शेतकरी बांधवांनी कपाशीच्या वेचनीची कामे पुढील ५ दिवस सुरु ठेवावी. वाणानुसार वेचणी केलेला कापूस कोरड्या आणि सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावा. कापूस वेचणी व साठवणुकीसाठी व पुढील संक्रमणाचे नुकसान टाळण्यासाठी प्लास्टिक/गोणपाटाच्या पिशविऐवजी कॉटन पिशव्याचा वापर करावा. • कोरड्या हवामानाचा अंदाज लक्षात घेता परिपक्व अवस्थेतील धान पिकाची कापणी व मळणी ची कामे पुढील ५ दिवसामध्ये सुरु ठेवावी. • आंतरमशागतीची कामे, पिकास ओलीत करण्याची कामे, कृषी रसायनांच्या

| |
|---|
| (कीटकनाशके, बुरशीनाशके इत्यादी) फवारणी ची कामे तसेच उभ्या पिकामध्ये खते कामे स्थानिक स्वच्छ हवामान परिस्थिती बघून करावी. • हरभरा पिकामध्ये अधिकतम उत्पादनासाठी पहिले ओलीत पेरणीनंतर ३० ते ४० दिवसांनी म्हणजेच पिक फुलोरा अवस्थेत असताना द्यावे तर दुसरे ओलीत पेरणीनंतर ६० ते ७० दिवसांनी म्हणजेच घाटे भरण्याच्या अवस्थेत द्यावे. |

## संक्षिप्त संदेश सल्ला:

| |
|---|
| • हरभरा पिकामध्ये अधिकतम उत्पादनासाठी पहिले ओलीत पेरणीनंतर ३० ते ४० दिवसांनी म्हणजेच पिक फुलोरा अवस्थेत असताना द्यावे तर दुसरे ओलीत पेरणीनंतर ६० ते ७० दिवसांनी म्हणजेच घाटे भरण्याच्या अवस्थेत द्यावे. |

## पिक निहाय सल्ला:

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| मका | • मका पिकास पाण्यासाठी संवेदनशील अवस्थेत जसे कि रोप अवस्थेत (पेरणीनंतर २५ ते ३० दिवसांनी), तुरा बाहेर पडताना (पेरणीनंतर ४५ ते ५० दिवसांनी), फुलोरा अवस्था (पेरणीनंतर ६० ते ६५ दिवसांनी) आणि दाने भरण्याच्या वेळी (७५ ते ८० दिवसांनी) ओलीत करावे. |
| कपाशी | • कोरड्या हवामानाचा अंदाज लक्षात घेता कापूस पिक पिकाची बोंडे फुटून कापूस बाहेर पडण्याच्या अवस्थेत आहे तेथे शेतकरी बांधवांनी कपाशीच्या वेचनीची कामे पुढील ५ दिवस सुरु ठेवावी. वाणानुसार वेचणी केलेला कापूस कोरड्या आणि सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावा. कापूस वेचणी व साठवणुकीसाठी व पुढील संक्रमणाचे नुकसान टाळण्यासाठी प्लास्टिक/गोणपाटाच्या पिशविऐवजी कॉटन पिशव्याचा वापर करावा. |
| हरभरा | • हरभरा पिकामध्ये अधिकतम उत्पादनासाठी पहिले ओलीत पेरणीनंतर ३० ते ४० दिवसांनी म्हणजेच पिक फुलोरा अवस्थेत असताना द्यावे तर दुसरे ओलीत पेरणीनंतर ६० ते ७० दिवसांनी म्हणजेच घाटे भरण्याच्या अवस्थेत द्यावे. • हरभरा पिकामध्ये मर रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी पिकात दीर्घकाळ पाणी साचून राहणार नाही यासाठी पिकास जास्त काळ ओलीत करणे टाळावे व ट्रायकोडर्मा या जैविक बुरशीनाशकाची ४० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून जमीनीवर फवारणी करावी किंवा आवळणी करावी किंवा थायोफिनेट मिथाईल ७० डब्लूपी २५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • घाटे अळीच्या एकात्मिक व्यवस्थापनासाठी शेतामध्ये प्रती हेक्टरी २० पक्षीथांबे लावावे. घाटे अळीच्या नियंत्रणासाठी कामगंध सापळे (हेक्झाल्युर) एकरी दोन किंवा हेक्टरी पाच लावावेत. सापळ्यामध्ये सतत तीन दिवस आठ ते दहा पतंग आढळल्यास व्यवस्थापनाच्या उपाययोजना कराव्यात. पिकाचे निरीक्षण करून किडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास किंवा पिक ४० ते ५० % फुलोरा अवस्थेत असताना सर्वप्रथम वनस्पतीजन्य किंवा जैविक किटकनाशकांना प्राधान्य द्यावे. त्यासाठी पहिली फवारणी निंबोळी अर्क ५ % किंवा अझाडिरेकटीन ३०० पीपीएम ५० मिली प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात मिसळून नापस्याक पंपाने फवारणी करावी. पावर स्प्रेयर ने फवारणी करायची असल्यास किटकनाशकाची मात्रा तीन पट करावी. किडीने आर्थिक नुकसान पातळी गाठली असल्यास क्विनालफॉस २५ टक्के ईसी २० मिली किंवा ईमामेक्टिन बेन्झोएट ५ % एसजी ३ ग्राम किंवा फ्ल्यूबेंडीअमाईड २० % डब्ल्यूजी ५ ग्राम किंवा क्लोरॅंट्रानिलिप्रोल १८.५ एससी २.५ मिली प्रती १० लिटर पाण्यत मिसळून फवारणी करावी. हरभरा पिक |

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| | २० ते ३० दिवसाच्या अवस्थेत असताना पाणी व अन्नद्रव्यासाठी पिकाची तनासोबत स्पर्धा टाळण्यासाठी दोन वेळा खुरपणी व कोळपणी करावी. |
| मोहरी | • ढगाळ हवामान आणि रात्रीचे कमी तापमान मोहरीमध्ये मावा प्रादुर्भावास अनुकूल आहे. मावा प्रादुर्भावाच्या नियंत्रणासाठी थायोमेटॉन २५ ईसी ८ मि.ली प्रति १० लिटर पाण्यात किंवा डायमेथोएट ३० ईसी १० मि.ली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. पिकाला संरक्षित ओलीत द्यावे तसेच एक सिंचन सोय उपलब्ध असल्यास फुल अवस्थेत, दोन सिंचन सोय उपलब्ध असल्यास ३० दिवसांनी पीक अवस्थेत आणि फुल अवस्थेत व जिथे तीन सिंचन सोय उपलब्ध असल्यास २५-३० दिवसांच्या अंतराने पिकाला संरक्षित ओलीत द्यावे. • मोहरी पिकातील अल्टरनेरीया करपा या बुरशीजन्य रोग व्यवस्थापनासाठी प्रती एकरी मेटॅलॅक्सिल ८ % + मॅंकोझेब ६४ % डब्ल्यूपी १००० ग्राम प्रती ४०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| गहू | • गहू पिकास पेरणीनंतर १८ ते २० दिवसानंतर मुकुट मुळे फुटण्याच्या अवस्थेत पहिले पाणी द्यावे. या अवस्थेत पाण्याचा ताण बसल्यास ३३ टक्के पर्यंत उत्पादनात घट येऊ शकते. • गहू पिकास मर्यादित सिंचनाची उपलब्धता लक्षात ठेऊन, एकाच ओलिताची व्यवस्था असल्यास पेरणीनंतर ४२ दिवसांनी, दोन ओलिताची व्यवस्था असल्यास २१ व ६५ दिवसांनी व तीन ओलिताची व्यवस्था असल्यास २१, ४२ आणि ६५ दिवसांनी ओलीत करावे. • पुरेश्या ओलिताची व्यवस्था असल्यास गहू पिकास, पहिले ओलीत मुकुट मुळे फुटण्याची अवस्था (पेरणीनंतर १८-२० दिवस), दुसरे ओलीत जास्तीत जास्त फुटव्याच्या अवस्थेत (पेरणीनंतर ३० ते ३५ दिवस), तिसरे ओलीत कांडी धरण्याच्या उशिरा अवस्थेत (पेरणीनंतर ४५ ते ५० दिवस), चौथे ओलीत फुलोरा अवस्थेत (पेरणीनंतर ६५ ते ७० दिवस), पाचवे ओलीत दाण्याची दुधाळ अवस्था (पेरणीनंतर ८० ते ८५ दिवस) असताना करावे. |
| तूर | • तूर पिकास फुलोरा व शेंगा भरण्याच्या अवस्थेत अवस्थेत १ किंवा २ संरक्षित ओलीत करावे. • तूर पिकावरील पाने पोखरणारी अळी, पिसारी पतंग, शेंग माशी आणि पाने गुंडाळणारी मारुका अळी च्या व्यवस्थापनासाठी • प्रति हेक्टर २० पक्षी थांबे शेतात उभारावे. त्यामुळे पक्षी किडीच्या अळया खाऊन फस्त करतात. • पहिली फवारणी (५० टक्के फुलोरावर असतांना) निंबोळी अर्क ५ टक्के किंवा अॅझाडीरक्टीन ३०० पीपीएम ५० मि.ली. किवा अॅझाडीरेक्टीन १५० पीपीएम २५ मि.ली. किंवा एच.ए.एन.पी.व्ही. (१x१०' पिओबी/मिली) ५०० एल.ई/हे. किंवा बॅसिलस थुरेन्जेनेसीस १५ मि.ली. किंवा क्विनॉलफॉस २५ ई.सी. २० मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • दुसरी फवारणी (पहिल्या फवारणीनंतर १५ दिवसांनी) इमामेक्टीन बेन्झोट ५ टक्के ३ एस.जी. ग्रॅम किंवा लॅबडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही १० मि.ली. किंवा क्लोरॅंट्रनिलिप्रोल १८.५ टक्के एस.सी. प्रवाही २.५ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी, अळ्यांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात असल्यास तुरीच्या झाडाखाली पोते टाकून झाड हलवावे, त्यामुळे झाडावरील अळ्या पोत्यावर पाहतील त्या गोळा करून नष्ट कराव्यस्त. • पाने गुंडाळणारी मारुका अळी च्या नियंत्रणासाठी फ्लूबेंडामाईड २० डब्ल्यूजी ६ ग्राम किंवा नोवालुरोन ५.२५ + इंडोक्झाकार्ब ४.५० % एससी १६ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |

**फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला:**

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| कांदा | • कांदा पिकाला लागवडीनंतर जमिनीतील ओलाव्यानुसार ७-१० दिवसांच्या अंतराने ओलीत करावे. सर्वसाधारणपणे रब्बी कांदा पिकाला १२-१५ ओलीताची गरज असते. |
| लसून | • लसून पिकास कमी पण नियमित पाणी आवश्यक आहे. उगवण झाल्यानंतर ८ ते १० दिवसाच्या अंतराने पिकाच्या गरजेनुसार जमिनीच्या मगदुराप्रमाणे पाण्याच्या पाळ्या द्याव्या. साधारणपणे १२ ते १५ पाण्याच्या पाळ्या लागतात. |
| संत्रा | • आंबिया बहारातील परिपक्व फळांची काढणी शक्यतो उरकून घ्यावी तसेच झाडांचे पाणी थांबवून पाण्याचा ताण द्यावा. • चांगल्या प्रकारे ताण देण्यासाठी सायकोसील २ मिली प्रती लिटर पाण्यात मिसळून डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात फवारणी करावी. • आंबिया बहराचे फळ तोडणी झाल्यानंतर वाळलेल्या फांद्या व सुकलेली साल काढावी व लगेच कार्बेन्डाझीम १ ग्राम प्रती १ लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. रोपवाटिका धारकांनी बडींग सुरु करावे. • संत्रा पिकाच्या मृग बहारातील फळबागेतील झाडासाठी ठिबक सिंचन चालू ठेवावे. ठिबक सिंचनाने ६ वर्षाच्या झाडांकरिता प्रती झाड प्रती दिवस ४१ लिटर पाणी द्यावे, ८ वर्ष वयाच्या झाडांकरिता प्रती झाड प्रती दिवस ६५ लिटर पाणी, १० वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त वयाच्या झाडास प्रती झाड प्रती दिवस ८२ लिटर पाणी द्यावे. मृग बहार पिकासाठी ठिबक सिंचन सुरू ठेवावा. • कोळी किडीचा प्रादुर्भाव ज्यामध्ये हिरव्या फळांवर तांबूस रंगाचे चट्टे दिसतात जे हळू हळू काळे दिसतात. ज्याला स्थानिक भाषेत शेतकरी लाल्या म्हणतात. कोळी किडीच्या व्यवस्थापनासाठी डायकोफॉल १.५ मिली किंवा इथिऑन २ मिली किंवा पाण्यत विरघळणारे गंधक ३ ग्राम प्रती १ लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. आवश्यकता भासल्यास १५ दिवसाच्या अंतराने फवारणी करावी. • संत्रा पिकाच्या झाडावर (विशेषत: रोपवाटिकांमध्ये असलेली झाडे) पाने गुंडाळणाऱ्या अळीच्या व्यवस्थापनासाठी, प्रादुर्भाव ग्रस्त पाने काढून टाकावी तसेच थायमिथोक्झाम ०.३ ग्रॅम किंवा ईमिडाक्लोप्रिड ०.५ मिली किंवा क्विनालफॉस २.० मिली किंवा डायमेथोएट २ मिली प्रती लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. वरीलपैकी कोणत्याही कीटकनाशकासह दुसरी फवारणी १५ दिवसानंतर अधिक चांगल्या परिणामासाठी घ्यावी. झाडाच्या बुंध्यामधून फायटोप्थोरा (डिंक्याचा स्त्राव) रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास डिंकाचा स्त्राव तीक्ष्ण चाकूच्या सहाय्याने खरडून त्या ठिकाणी मेफेनोक्झाम एमझेड- ६८ किंवा फोसेटील आम्लाची पेस्ट लावावी. |
| मिरची | • तापमानातील चढ उतार व उच्च आद्रतेमुळे मिरची पिकावर भुरी रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास व्यवस्थापनासाठी प्रती एकरी अझॉक्सिस्ट्रोबिन २३ % एससी २००-३०० मिली प्रती २०० लिटर पाणी किंवा फ्लुसिलाझोल ४० % ईसी ४०-६० मिली प्रती २०० लिटर पाणी किंवा हेक्साकोनाझोल २ % एससी १२०० मिली प्रती २०० लिटर पाणी किंवा क्रेसॉक्सिम मिथाइल ४४.३ % एससी २०० मिली प्रती २०० लिटर पाणी किंवा टेब्युकोनाझोल २५.९ % ईसी २००-३०० मिली प्रती २०० लिटर पाणी किंवा अझोक्सीस्ट्रोबिन १८.२ % डब्ल्यू/डब्ल्यू + डायफेनोकोनाझोल ११.४ % डब्ल्यू/डब्ल्यू एससी २०० मिली प्रती २००-३०० लिटर पाणी किंवा अझोक्सिस्ट्रोबिन ११ % डब्ल्यू/डब्ल्यू + टेबुकोनाझोल १८.३ % डब्ल्यू/डब्ल्यू एससी २४०-२८० मिली प्रती २०० लिटर पाणी किंवा अझोक्सिस्ट्रोबिन १२.५% डब्ल्यू/डब्ल्यू + टेबुकोनाझोल १२.५% डब्ल्यू/डब्ल्यू एससी ३२० मिली प्रती १५०-२०० लिटर पाणी किंवा कार्बेन्डाझिम २५ % + फ्लुसिलाझोल १२.५ % एसई ४०० मिली प्रती २०० लिटर पाणी किंवा क्लोरोथॅलोनिल ४०% डब्ल्यू/डब्ल्यू + डिफेनोकोनाझोल ४% डब्ल्यू/डब्ल्यू एससी ४०० मिली प्रती २०० लिटर पाणी किंवा फ्ल्यूओपाय्रम १७.७ डब्ल्यू/डब्ल्यू + टेबुकोनाझोल १७.७ % डब्ल्यू/डब्ल्यू एससी |

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| | २०० मिली प्रती २०० लिटर पाणी किंवा फ्लक्सापायरॉक्सॅड २५० g/I + पायरॅक्लोस्ट्रोबिन २५० g/I एससी ८०-१०० मिली प्रती २०० लिटर पाणी किंवा पिकॉक्सीस्ट्रोबिन ६.७८ % + ट्रायसायक्लाझोल २०.३३ % डब्ल्यू/डब्ल्यू एससी ४०० मिली प्रती २०० लिटर पाणी किंवा प्रोक्लोराझ २४.४ % + टेब्युकोनाझोल १२.१ % डब्ल्यू/डब्ल्यू ईडब्ल्यू ४०० मिली प्रती २०० लिटर पाणी किंवा टेबुकोनाझोल ६.७ % + कॅप्टन २६.९ % डब्ल्यू/डब्ल्यू एससी ४०० मिली प्रती २०० लिटर पाणी या प्रमाणात मिसळून फवारणी करावी. |
| टोमॅटो | • टोमॅटो पिकातील अल्टरनेरीया करपा (Alternaria blight) या बुरशीजन्य रोग व्यवस्थापनासाठी प्रती एकरी मेटीराम ७० डब्ल्यूजी ८०० ग्राम प्रती २०० ते २८० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |

## पशुधन विषयक निहाय सल्ला:

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| गाय | • तापमानातील घट लक्षात घेता गुरांना रात्री शेडमध्ये ठेवा आणि त्यांना थंडीपासून संरक्षण करण्यासाठी कोरड्या जागेची व्यवस्था करावी. थंडीच्या परिस्थितीचा सामना करण्यासाठी व जनावरांना निरोगी ठेवण्यासाठी खाद्यामध्ये प्रथिने आणि खनिजांचे प्रमाण वाढवावे. प्राण्यांची ऊर्जेची गरज भागवण्यासाठी थंडीच्या काळात दररोजच्या आहारात 10 - 20 % गव्हाचे धान्य, गूळ इ. चा समावेश करावा. जनावरांना खनिज मिश्रण व मिठाचा समावेश करावा. कोंबड्यासाठी पोल्ट्री शेड उबदार राहण्यासाठी कृत्रिम प्रकशाची व्यवस्था करावी. |
| म्हैस | • जनावरांचे थंडीपासून संरक्षण करण्यासाठी रात्रीच्या वेळी जनावरांना गोठ्यामध्ये/सुरक्षित ठिकाणी ठेवावे. जनावरांचे थंडीपासून संरक्षण करण्यासाठी ४ ते ६ इंच जाडीचे भाताचा पेंढा, गव्हाचा पेंढा, करावातीचे धूळ इत्यादीचे बेडिंग करावे. जनावरांच्या गोठ्याचा व जमिनीचा भाग कोरडा व स्वच्छ ठेवावा. जनावरांना पिण्यासाठी २४ तास स्वच्छ पाण्याची व्यवस्था करावी. जनावरांच्या पाण्याची कुंड/साधने याची आठवड्यातून एकदा स्वच्छता करावी. उत्पादकता व प्रजनन वाढीच्या दृष्टीने जनावरांना दररोज ३० ते ४० ग्राम मिनरल मिक्श्चर द्यावे. |
| बकरा किंवा बकरी | • शेळ्यांना पायखुरी/तोंडखुरी, घटसर्प आणि आंत्रविषार टाळण्याकरिता पशुवैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्ल्याने लसीकरण करावे. जनावरांना स्वच्च्छ आणि थंड पाण्याची सोय करावी. |

## मासेमारी निहाय सल्ला:

| मासेमारी | मासेमारी निहाय सल्ला |
|---|---|
| ताजे पाणी | • थंडी मध्ये मास्यांची पचन संस्था आकसली जाते व खाण्याचे प्रमाण कमी होते त्यामुळे थंडीमध्ये खाद्याचे प्रमाण ५० ते ७५ टक्के कमी करावे हिवाळ्यामध्ये तळ्यातील वरच्या पाण्याचे तापमान कमी होते त्यामुळे मासे तळास राहणे पसंत करतात यासाठी पाण्याची पातळी सहा ते सात फूट ठेवावी. हिवाळ्यामध्ये सूर्यप्रकाशाची तीव्रता व कालावधी कमी होते व प्रकाश संश्लेषण क्रिया मंदावल्याने |

| मासेमारी | मासेमारी निहाय सल्ला |
|---|---|
| | पाण्यातील प्राणवायूचे प्रमाण कमी होते यासाठी पाणी बदलून किंवा हवा सोडून पाण्यातील प्राणवायूचे प्रमाण योग्य राखावे. |

**इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला:**

| इतर (माती / जमीन तयार करणे) | इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला |
|---|---|
| सामान्य सल्ला | • रोपवाटीकेतील वांगी, टोमाटो, फुलकोबी व पानकोबीचे ४ ते ६ आठवडे वयाची रोपांची शेतात लागवड करावी. मेथी, पालक, कोथिंबीर, मुळा व गाजर याची टप्प्याटप्प्याने लागवड करावी. |